# परिणिता
# ब्राह्मणकन्या
# देवदास

**शरत्‌चंद्र चट्टोपाध्याय**

अनुवाद

**मानसी काणे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**परिणिता-ब्राह्मणकन्या-देवदास :** शरत्चंद्र चट्टोपाध्याय
अनुवाद : मानसी काणे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मानसी काणे
'मानस' बगला, नीलकंठ नगर
हरिपूर रोड, हरिपूर, सांगली - ४१६४१६
फोन नं. ०२३३ - २३३१५९९ मो. नं. : ९४२३८६८५९९

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २९०/-

# परिणिता
# ब्राह्मणकन्या
# देवदास

# परिणिता

# १

गुरुचरणबाबू खोलीत एकटेच बसले होते. विचारात गढून गेले होते. इतक्यात त्यांच्या धाकट्या मुलीने आत येऊन सांगितले, ''बाबा, आईला छोटंसं बाळ झालं आहे. मुलगी आहे.'' बातमी गोड होती पण त्यांच्या काळजाला बाण मारल्यासारखी टोचली. काहीतरी भयंकर घडल्यासारखा त्यांचा चेहरा उतरला. कोणतीही अडचण न येता त्यांना पाचवी मुलगी झाली होती.

गुरुचरणबाबू म्हणजे अगदी सामान्य माणूस. महिना साठ रुपये पगारावर काम करणारा नोकर. त्यांची परिस्थिती फार वाईट आणि आयुष्य तर अगदीच नीरस. डोळ्यांत निराशा भरून राहिलेली. तब्येत मरतुकड्या घोड्यासारखी आणि शरीर हाडांचा सापळा. त्यांना पाहिल्यावर वाटायचं की, ते जिवंत असून निर्जीव आहेत. अशा स्थितीत ही अशुभ बातमी ऐकून त्यांचं रक्तच गोठलं. हातात हुक्का घेऊन एका फाटक्या जीर्ण तक्क्याचा आधार घेत ते अंगात त्राण नसल्यासारखे पडून राहिले. त्यांना श्वास घ्यायलासुद्धा त्रास होत होता हे पाहणाऱ्याला समजत होते.

अन्नाकालीनं सांगितलेली ही गोड बातमी ऐकूनही गुरुचरणबाबू काही बोलले नाहीत. थोड्या वेळाने त्यांना हलवत तिनं पुन्हा विचारलं,''बाबा, छोटीला पाहायला नाही येणार?'' तिच्याकडे पाहात थकल्या स्वरात गुरुचरणबाबू म्हणाले, ''बाळा, घशाला कोरड पडली आहे. जा एक ग्लास थंडगार पाणी घेऊन ये.'' अन्नाकाली पाणी आणायला गेली. इकडे त्यांच्या डोळ्यांसमोर बाळंतपणाच्या खर्चाचे आकडे नाचू लागले. वेगवेगळ्या चिंतांनी त्यांच्या मनात आपली जागा पकडली. रेल्वे प्लॅटफॉर्मवर आली की, तिसऱ्या वर्गाचे प्रवासी कसे एकमेकांच्या अंगावर चढून डब्यात जागा पकडून बसतात, अगदी तसं. त्यांचं डोकं जत्रेत गोल गोल फिरणाऱ्या पाळण्यासारखं गरगरू लागलं.

दुर्गापूजा जवळ आली आहे हे त्यांच्या लक्षात होतं. गेल्या वर्षी दुसऱ्या मुलीच्या लग्नात त्यांनी आपलं बाऊबाजारमधलं वडिलोपार्जित दुमजली घर गहाण ठेवलं होतं. त्याचं सहा महिन्यांचं व्याज थकलं होतं. दुर्गापूजेच्या सणासाठी मधल्या मुलीकडं फळं, मिठाई, कपडे पाठवायचे आहेत. कालपासून ऑफिसचा हिशेब जमत नाही. रात्री आठपर्यंत खटाटोप करूनही काही जमलं नाही. आज दुपारपूर्वी हिशेब जमवून पाठवायचा आहे. हे सगळं होतंच. त्यात भर म्हणून साहेबांनी स्वच्छ कपडे घालून यायचं फर्मान काढलं होतं. या ऑर्डरचं उल्लंघन केल्यास दंड होणार होता. पगार कापला जाणार होता. आठवडाभर शोधूनही त्यांना स्वस्तात कपडे धुऊन देणारा धोबी मिळत नव्हता. अडचणी अशा चोहोबाजूंनी वेढून बसल्या होत्या. त्यामुळेच की काय ते तक्क्याचा आधार घेऊन हुक्का ओढत पडून राहिले होते. त्यांनी परमेश्वराची आळवणी सुरू केली. ''देवा, या कलकत्त्यात रोज कितीतरी माणसं गाडीखाली, कारखाली, घोड्यांच्या पायदळी सापडून मरतात. ते काय तुला आमच्यापेक्षा जास्त पापी वाटतात काय? दयाघना, पतितपावना, मी जर एखाद्या गाडीखाली सापडलो तर स्वत:ला भाग्यवान समजेन. देवा, मला एवढा वर दे.'' अन्नाकाली पाणी घेऊन आली. ''बाबा, उठा पाणी घ्या.'' पाणी पिऊन गुरुचरण म्हणाले, ''बाळा, भांडं घेऊन जा.'' ती गेल्यावर ते आडवे झाले आणि पुन्हा विचारात गढून गेले. ललिता त्यांच्या खोलीत येत म्हणाली, ''मामा, चहा आणला आहे.'' चहाचं नाव ऐकताच ते पुन्हा उठले. ललिताकडे पाहून त्यांनी समाधानानं एक दीर्घ श्वास घेतला. त्यांची अर्धी काळजी जणू दूर झाली. म्हणाले, ''बेटा, थोडा वेळ माझ्याजवळ बैस. रात्रभर जागी आहेस ना?''

हलकंसं हसत ललिता मामाजवळ बसली. तिला त्यांच्याबद्दल फार जिव्हाळा होता. म्हणाली, ''नाही मामा, फार नाही जागावं लागलं रात्री.'' आपल्या मामांची तब्येत कशी आहे, त्यांना किती काळज्या आहेत हे ती जाणून होती, पण देवाजवळ प्रार्थना करण्याखेरीज तिच्या हाती दुसरं काही नव्हतं. आईबापावेगळ्या ललितावर त्यांचं फार प्रेम होतं. ती जवळ बसताच त्यांनी तिच्या मस्तकावरून प्रेमानं हात फिरवत बोलायला सुरुवात केली, ''बेटा, तू एखाद्या चांगल्या घरी असतीस तर मला फार आनंद झाला असता.'' काही न बोलता ती फक्त ऐकत होती. गुरुचरणबाबू पुढं म्हणाले, ''ललिता, तुला या गरीब बिचाऱ्या मामाच्या घरी रात्रंदिवस काम करावं लागतं ना?'' मान हलवून ती म्हणाली, ''नाही मामा,

रात्रंदिवस कुठं? सगळ्यांसारखंच मीसुद्धा थोडंसं काम करते एवढंच.'' चहा पीत पीत हसून मामांनी विचारलं, ''ललिता, आज जेवणखाण्याची काय व्यवस्था?'' मामाकडे पाहात ती म्हणाली, ''मामा, आज मी स्वयंपाक करणार आहे.'' त्यांनी आश्चर्यानं विचारलं, ''तू? तू काय करणार? तुला काय स्वयंपाक येतो?''

''येतो, मामीनं शिकवला आहे मला.''

चहाचा कप ठेवत गुरुचरणबाबूंनी विचारलं,''खरंच?''

''हो मामा, अगदी खरं, कितीतरी वेळा मी मामीबरोबर स्वयंपाक केला आहे.'' हे ऐकल्यावर त्यांनी ललिताच्या डोक्यावर हात ठेवून तिला आशीर्वाद दिला. आज त्यांचं एक कर्तव्य संपलं होतं.

गुरुचरणबाबूंचं घर रस्त्याकडेला होतं. जाणारे येणारे घरातून सहज दिसत असत. चहा पिता पिता रस्त्याकडे पाहात विचारलं, ''कोण? शेखर, काय रे? इकडे ये बरं जरा?''

एक सुदृढ तरुण आत आला. त्याला जवळ बसवत त्यांनी विचारलं, ''सकाळी सकाळी तुझ्या काकूकडची बातमी समजली असेल.'' हसत हसत शेखर म्हणाला, ''मुलगी झाली हीच ना? की आणखी काही आहे?'' उसासा सोडत गुरुचरणबाबू म्हणाले, ''तू एवढंच ना असं विचारतोस, पण माझ्यावर काय ओढवलंय ते मला माहीत.'' यावर शेखर म्हणाला, ''काका, असं नका म्हणू. काकूंनी ऐकलं तर त्यांना वाईट वाटेल. शेवटी देवानं दिलंय त्यात आनंद मानायला हवा. ते स्वीकारून समाधानी राहायला हवं.''

थोडा वेळ शांत राहून परत गुरुचरणबाबू बोलले, ''देवानं दिलेलं समाधानानं, आनंदानं स्वीकारायला हवं हे मलासुद्धा समजतं, पण देवसुद्धा चांगल्या वाईटाचा काही विचार करत नाही. त्याला माहीत आहे मी किती गरीब आहे, मग असली कृपा माझ्या गरिबावर का? इतक्या मुली माझ्याच घरी का जन्माला घालतो आहे तो? हे घर तुझ्या वडिलांकडे गहाण ठेवलेले आहे. त्याचं मला काही वाटत नाही; पण एक ओझं डोक्यावरचं उतरतं न उतरतं तोच दुसरं येतं याची चिंता आहे. शेखर, आता तूच बघ, ही इतकी गुणी सुंदर मुलगी ललिता. एखाद्या राजघराण्यात शोभेल असं हे अमूल्य रत्न गरिबाघरी शोभणार नाही. तूच विचार कर. तिला कसल्याही घरी मी कसं पाठवू? हिच्या रूपापुढं राजेमहाराजांच्या सिंहासनाची माणकं फिकी पडतील. या अनमोल रत्नाला साजेसा कोणी रत्नपारखी इथं नाही याचंच दु:ख आहे. आजकाल लोकांना फक्त पैसा हवा आहे. माझ्याकडे

तो नाही. त्यामुळे एखाद्या गावंढळ माणसाशी तिचं लग्न करून द्यावं लागणार. बेटा, तूच विचार कर, माझ्या मनाला काय वाटत असेल, मला किती वाईट वाटत असेल? ललिताला आता तेरावं वर्ष संपेल; पण माझ्याकडे फुटकी कवडीसुद्धा नाही. मग लग्नाचा कसा विचार करू! कोणाकडे विषय काढू?''

बोलता बोलता त्यांचे डोळे भरून आले. शेखर निमूटपणानं सगळं ऐकत होता. थोडा वेळ थांबून त्यांनी पुन्हा बोलायला सुरुवात केली. ''शेखर, आता तूच काहीतरी उपाय सुचव. तुझे कितीतरी तरुण मित्र असतील, तुझं ऐकून एखादा ललिताचा स्वीकार करेल आणि या मुलीचं कल्याण होईल. मी ऐकलं आहे की, आजकालचे गरीब तरुण पैसा पाहात नाहीत. त्यांना सुंदर, गुणी, सुशील मुलगी हवी असते. परमेश्वराच्या कृपेने आणि तुझ्या प्रयत्नांनी असा कोणी तयार झाला तर माझी अडचण दूर होईल. मी मनापासून तुला आशीर्वाद देतो की, तू सुखी होशील. राज्य करशील. यापेक्षा जास्त मी काही करू शकत नाही. तुमच्या कृपेवरच मी इथं राहतो आहे. तुझे वडील मला धाकटा भाऊ समजतात. चांगलं वागतात.'' शेखर नम्रपणानं म्हणाला, ''मी माझ्याकडून सर्वतोपरी प्रयत्न करेन.'' गुरुचरणबाबू पुन्हा म्हणाले, ''विसरू नकोस बेटा. तू ललिताला चांगलं ओळखतोस. आठव्या वर्षापासून तूच हिला लिहा-वाचायला शिकवलं आहेस. हिची बुद्धी, सुशील आणि सभ्य प्रवृत्ती तुला चांगली माहिती आहे. ही लहान मुलगी आजपासून माझा संसार सांभाळणार आहे. सगळी जबाबदारी हिच्यावर पडली आहे.''

इतका वेळ ललिता शांत बसली होती; पण आता तिने शेखरकडे पाहिलं. त्याच्याशी दृष्टादृष्ट होताच तिनं हसून मान खाली घातली. गुरुचरणबाबूंनी एक दीर्घ श्वास घेतला. पुन्हा बोलू लागले, ''ललिताच्या वडिलांनी खूप पैसे मिळवले; पण ते दानशूर होते. सगळी दौलत दानधर्मात खर्च केली. एकुलत्या एका मुलीसाठी काहीसुद्धा ठेवले नाही.''

शेखर गप्प बसून होता.

गुरुचरणबाबू स्वत:शीच बोलत होते. ''त्यांनी काहीच ठेवले नाही असं तरी कसं म्हणू? त्यांनी ज्यांचं दु:ख दूर केलं त्यांचा आशीर्वाद माझ्या या लेकीला नक्कीच मिळाला आहे. म्हणून तर ती अन्नपूर्णा आहे. त्यांचे आशीर्वाद नसते तर ही इतकी गुणी कशी झाली असती? तूच विचार कर, शेखर?''

शेखर काही न बोलता हसत होता. थोड्या वेळानं तो परत निघाला. गुरुचरणबाबूंनी पुन्हा आठवण करून दिली, ''मी सांगितलेलं लक्षात ठेव हं.